जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणा-या जिल्हा- तालुका- गाव, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी यांना पुरस्कार देणेबाबत.- कालबध्द कार्यक्रम.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**

**शासन परिपत्रक क्र. मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८**

मंत्रालय , मुंबई -४०००३२

**दिनांक : १० ऑक्टोबर, २०१६.**

वाचा :

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक

(१) शासन निर्णय क्र. मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६.

शासन परिपत्रक :

राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. या अभियानात उत्कृष्ठ योगदान देण्या-या जिल्हा, तालुका, गाव, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी यांना पुरस्कार देण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर सर्व प्रकारच्या पुरस्कारांचे प्रस्ताव जिल्हास्तर समितीकडे दिनांक ३० ऑक्टोंबर पर्यंत पाठविण्याच्या, सदर जिल्हास्तरावरील पुरस्कार दि. ३० नोव्हेंबर रोजीपर्यंत विभागीय स्तरावरील ३१ डिसेंबर रोजी पर्यंत व राज्यस्तरावरील पुरस्कार दि. ३१ जानेवारी रोजीपर्यंत निवडण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच विभागस्तर पुरस्कार कार्यक्रम दिनांक २० फेब्रुवारी रोजी व राज्यस्तर पुरस्कार कार्यक्रम दिनांक २७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात यावेत. अशाही सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर पुरस्कार प्रदानाचे कार्यक्रम दिनांक २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २०१६ या दरम्यान घेण्याबाबत शासन स्तरावर विचाराधीन आहे. त्यानुषंगाने पुरस्कारांचे प्रस्ताव पाठविण्याची कालमर्यादा बदलण्याचे ठरविण्यात आले असून, सर्व संबंधितांनी आता विविध स्तरावर प्रस्ताव प्राप्त करुन घेणे, पुरस्कारांची अंतिम निवड करणे याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

## पुरस्कार निवडीचे प्रस्ताव पाठविण्यासाठी कालमर्यादा:-

सन २०१५-१६ या वर्षात “जलयुक्त शिवार अभियान” मध्ये भाग घेणाऱ्या गावे, तालुके यांनी प्रस्ताव तालुकास्तरावरून जिल्हास्तर समितीकडे व जिल्हा स्तरावरून विभागस्तर समितीकडे व त्यानंतर राज्यस्तरावर, खालील प्रमाणे विहित केलेल्या कालमर्यादेत पाठवणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | समित्यांनी करावयाची कार्यवाही | कालमर्यादा / पर्यंत |
|---|---|---|
| १ | गाव / तालुक्याकडुन केलेल्या कामांचे नामांकन पत्र/ पुरस्कार प्रस्ताव भरुन घेणे | २० ऑक्टोंबर, २०१६ अखेर पर्यंत |
| २ | जिल्हा स्तरावरुन गाव व तालुक्याची पहाणी करणे | २६ ऑक्टोबर |
| ३ | जिल्हा स्तरावरील गाव व तालुका निवड अंतिम करणे. जिल्ह्यांचे प्रस्ताव अंतिम करणे. | २९ ऑक्टोबर |
| ४ | विभागीय स्तरीय पारितोषिकासाठी गाव/ तालुका/जिल्हा यांचे प्रस्ताव विभागस्तरीय समितीस पाठविणे | २ नोव्हेंबर अखेर पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| ५ | विभागस्तरीय समितीने गाव/ तालुका/ जिल्हयांची पहाणी करणे | ५ नोव्हेंबर |
| ६ | विभाग स्तरावरील गाव, तालुका व जिल्हा निवड /निकाल अंतिम करणे | ८ नोव्हेंबर |
| ७ | राज्यस्तरीय पारितोषिकासाठी गाव, तालुका व जिल्हा यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे | १० नोव्हेंबर |
| ८ | राज्यस्तरीय समितीने गाव/तालुका/जिल्हा यांचे निवड/ निकाल अंतिम करणे | १८ नोव्हेंबर |
| ९ | पुरस्काराबाबतचा निर्णय कळविणे | १९ नोव्हेंबर |
| १० | विभाग स्तरावरील पुरस्कार वितरण कार्यक्रम | २५ नोव्हेंबर |
| ११ | राज्य स्तरावरील पुरस्कार वितरण कार्यक्रम | २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २०१६ दरम्यान |

गावे, तालुके व जिल्हा या सर्व स्तरांवरून मूल्यमापनाचे अहवाल विहित केलेल्या कालमर्यादेत विभागीय आयुक्तांमार्फत राज्य शासनास सादर होतील याबाबत विभागीय कृषि सहसंचालक (कृषि) यांची वैयक्तीक जबाबदारी राहील. विभागीय कृषि सहसंचालक (कृषि) यांनी याबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून कार्यवाही करावयाची आहे.

उपरोक्त कालबध्द कार्यक्रम गाव, तालुका, जिल्हा, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी, अशासकीय संस्था पुरस्कार या सर्व पुरस्कारांसाठी लागू राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१०१३२५०२१३२६ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c83ebbb277c2e72c85231b87f684c424a13c398a4f921b6d167a8c859e9817f5, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2016.10.10 16:22:30 +05'30'

**(शं.त्र्यं.जाधव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. विधानपरिषद / विधानसभा विरोधी पक्ष नेता यांचे खाजगी सचिव
४) सर्व मा. राज्यसभा / लोकसभा / विधानपरिषद / विधानसभा सदस्य
५) मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७) कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.
८) मुख्य सचिव यांचे सचिव,

९) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१५) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे,
१६) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पणलोत विकास यंत्रणा पुणे
१७) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१८) मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
१९) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
२१) कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
२२) कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी/कुलगुरु पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
२३) कुलगुरु, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,/सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२६) सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
२७) सर्व सहसंचालक, (सामाजिक वनीकरण ),
२८) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)
३०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
३१) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३२) सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,
३३) सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक,
३४) सर्व उपसंचालक,सामाजिक वनीकरण.
३५) सर्व उपायुक्त (विकास),
३६) सर्व उपायुक्त (रोहयो),
३७) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३८) महालेखापाल -१/२, महाराष्ट्र राज्य ,मुंबई / नागपूर . (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
३९) अप्पर संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कक्ष,
४०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४१) निवासी लेखापरीक्षा, अधिकारी, मुंबई.
४२) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
४३) नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई
४४) सर्व उपसचिव / अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
४५) जल-८ (निवडनस्ती) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई .